# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०२/१२/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०२/१२/२००९ रोजी सभा सुचना क्र. १३ दि. २३/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी पिठासिन अधिकारी श्री. विश्वास पाटील (उप जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर) हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| २) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ४) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ५) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ६) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ७) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ८) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| ९) | सौ. प्रभात प्रकाश पाटील | -- | सदस्या |
| १०) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ११) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सदस्य |
| १२) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १३) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १४) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १५) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १६) | सौ. अनिता ज. पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**पिठासिन अधिकारी :-**

महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी २ अर्ज प्राप्त झालेले आहेत. पहिला अर्ज आहे पाटील शरद केशव यांचा आणि दुसरा अर्ज आहे दिनेश दगडू नलावडे यांचा. दोन्ही अर्ज याठिकाणी वैध असल्याचे मी जाहिर करतो. दोन्ही अर्ज पात्र आहेत. आता मी ५ मिनीटाचा अवधी देतो. तर दोघांपैकी कोणाला माघार घ्यायची असेल तर आपण ५ मिनिटे वाट पाहुया.

दोन्ही उमेदवारांपैकी कोणाचा माघारीचा येतो का? वाटत नाही. तर आपण पुढच काम सुरू करू या.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण क्र. २ कलम (२१) पोटकलम (१) अन्वये स्थायी समिती करिता सभापती नेमणूक करण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस हे दोन उमेदवार वैध होते. श्री. पाटील शरद केशव आणि दुसरे श्री. दिनेश दगडू नलावडे या दोघांनी नामनिर्देशन पत्र दाखल केलेले आहेत. आणि छानणी केलेली असतांना दोन्ही वैध ठरलेली आहेत आणि निवडणूकीची प्रक्रीया सुरू केल्यानंतर माघार घेण्यासाठी अवधी दिला असता कोणत्याही उमेदवारांनी आपली उमेदवारी अर्ज मागे न घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिलेले आहेत आणि सभापती पद हे एकच असल्याने आणि उमेदवार दोन असल्याने आता आपण हात वर करून मतदान घेवू या. पहिले दिनेश दगडू नलावडे यांच्या बाजूने मतदान करणाऱ्या सदस्यांनी आपले हातवर करावेत. एकूण मोजा व नावे लिहा. तर श्री. शरद केशव पाटील यांच्या बाजुने मतदान करणाऱ्या सदस्यांनी आपले हात वर करावेत.

श्री. दिनेश दगडू नलावडे यांच्या बाजुने मतदान केलेल्या सदस्यांची नावे ग्रिटा स्टीफन फॅरो, हेलन जॉर्जी गोविंद, याकुब इस्माईल कुरेशी, अनिल दिवाकर सावंत, जुबेर अब्दुल्ला इनामदार, प्रभात प्रकाश पाटील, चंद्रकांत भिकालाल मोदी, दिनेश दगडू नलावडे, चंद्रकांत खंडोजी म्हात्रे, बर्नट अल्बर्ट डिमेलो, अनिता जयवंत पाटील, सुधा वासुदेव व्यास अणि श्री. शरद केशव पाटील यांच्या बाजुने

मतदान केलेल्या सदस्यांची नावे श्री. मदन उदितनारायण सिंह, शरद केशव पाटील, प्रविण मारेश्वर पाटील, वर्षा गिरधर भानुशाली तटस्थ सदस्य कोणी नाही ते निरंक आहे. मतदानावेळी एकूण हजर सदस्य १६ आहेत. श्री. दिनेश नलावडे यांच्या बाजुने १२ मतदान पडले. श्री. शरद पाटील यांच्या बाजुने ४ मतदान पडले. एकूण १६ तर श्री. दिनेश दगडू नलावडे यांना जास्त मत मिळाल्याने श्री. दिनेश दगडू नलावडे यांची निवडून आलेल्या दिनांकापासुन १ वर्षाच्या कालावधी करिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी जाहिर करत आहे.

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिकारी, श्री. दिनेश दगडून नलावडे यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचे सत्कार करत आहेत.

**प्रकरण क्र. ७३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००९-१० या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ६४ :-**

मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये स्थायी समिती करिता ''सभापती'' पदावर नेमणुक करणेसाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत नामनिर्देशन पत्र मागविली असता (१) श्री. पाटील शरद केशव, (२) श्री. दिनेश दगडू नलावडे ह्यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता दोन ही नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता कोणत्याही उमेदवाराने आपली उमेदवारी मागे न घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) श्री. दिनेश दगडू नलावडे ह्यांना १२ इतकी मते व (२) श्री. पाटील शरद केशव ह्यांना ०४ इतकी मते मिळाली.

**श्री. दिनेश दगडू नलावडे ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो
२) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३) श्री. याकुब ईस्माईल कुरेशी
४) श्री. अनिल दिवाकर सावंत
५) श्री. जुबेर अब्दुल्ला इनामदार
६) सौ. प्रभात प्रकाश पाटील
७) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
८) श्री. दिनेश दगडू नलावडे
९) श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे
१०) श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो
११) सौ. अनिता जयवंत पाटील
१२) सौ. सुधा वासुदेव व्यास

**श्री. शरद केशव पाटील ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. मदन उदितनारायण सिंह
२) श्री. शरद केशव पाटील
३) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील
४) श्री. वर्षा गिरीधर भानुशाली

**तटस्थ सदस्यांची नांवे – निरंक**

| | | |
|---|---|---|
| **मतदानावेळी एकूण हजर सदस्य** | :- | **१६** |
| **श्री. दिनेश दगडू नलावडे ह्यांच्या बाजूने** | :- | **१२** |
| **श्री. शरद केशव पाटील ह्यांच्या बाजूने** | :- | **०४** |
| **तटस्थ** | :- | **००** |
| **एकूण** | :- | **१६** |

श्री. दिनेश दगडू नलावडे ह्यांना जास्त मते मिळाल्याने श्री. दिनेश दगडू नलावडे यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या कालावधी करीता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**पिठासिन अधिकारी :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ११.२५ वा.**

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**